6 APR 2013
जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ
नोंदणी क्रमांक
दिनांक
शाखा
जिल्हाधिकारी नि.उ.जि.

**राष्ट्रीय भूमि अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम तथा ई- महाभूमि**
**ई-चावडी व ई-फेरफार आज्ञावलीच्या अंमलबजावणीसाठी**
**७/१२ च्या संगणकीकृत डाटाचे युनिकोडमध्ये रुपांतरण करणे,**
**अद्यावतीकरण करणे व व्हेरिफिकेशन व्हॅलिडेशन करण्याबाबत .**

अधिक्षक
जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ

जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख महाराष्ट्र राज्य पुणे,

परिपत्रक क्र.रा.भु.अ.आ.का.४/युनिकोड रुपांतरण/

प्र.क्र.१५/२०१२ दि. /०३/२०१३

15 MAR 2013

वाचाः-१) या कार्यालयाकडील पत्र क्र.एनएलआरएमपी-३७/स-१/२०१० दिनांक २९/०७/२०१०

२) या कार्यालयाकडील आदेश क्र.एनएलआरएमपी -१३२/एनएलआरएमपी-१/२०१२ दिनांक १६/०८/२०१२

३) या कार्यालयाकडील परिपत्रक क्र./२०१२ /रा.भु.अ.आ.का.४/प्र.क्र.४८/१२ दिनांक २६/११/२०१२

४) या कार्यालयाकडील पत्र क्र.रा.भु.अ.आ.का.-४/ई-चावडी/प्र.क्र.-१/१३ दिनांक ०३/०१/२०१३

५) महसुल विभागाकडील शासन निर्णय क्र.राभुअ-२०१३ / प्र.क्र.-२/ल-१ दिनांक ०४/०१/२०१३

६) महसुल विभागाकडील शासन निर्णय क्र.राभुअ-२०१३ / प्र.क्र.-३२/ल-१ दिनांक २३/०१/२०१३

७) या कार्यालयाकडील परिपत्रक क्र./रा.भु.अ.आ.का.४/ई चावडी/प्र.क्र.४१/१२, दिनांक ०१/०२/२०१३

---

## परिपत्रक

ई-महाभूमि तथा राष्ट्रीय भूमि अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम अंतर्गत जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, (म.राज्य) पुणे कार्यालयाने राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र,पुणे यांच्या मार्फत गावपातळीवरील तलाठयाकडील गाव नमुने १ ते २१ चे संगणकीकरण करण्यासाठी ई-चावडी अज्ञावली तर अधिकार अभिलेखातील फेरफार प्रक्रिया ऑनलाईन करण्यासाठी ई-फेरफार ही अज्ञावली विकसित केली आहे.महसुल विभागाकडील शासन निर्णय क्र.राभुअ-२०१३ / प्र.क्र.-२/ल-१ दिनांक ०४/०१/२०१३ नुसार ई-चावडी आज्ञावली व शासन निर्णय क्र.राभुअ-२०१३ / प्र.क्र.-३२/ल-१ दिनांक २३/०१/२०१३ नुसार ई-फेरफार आज्ञावली संपूर्ण राज्यात लागू करण्यासाठी मान्यता दिलेली असुन जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, (म.राज्य) पुणे हे सदर दोन्ही आज्ञावलींच्या अंमलबजावणीचे मुख्य नियंत्रण अधिकारी आहेत. आता दोन्ही आज्ञावली संपूर्ण राज्यात लागू करावयाच्या आहेत. ई-फेरफार व ई-चावडी या आज्ञावली वेबबेस्ड असुन त्यामध्ये डाटा साठविण्यासाठी युनिकोड (UNICODE) फॉरमॅटचा वापर करणेत येणार आहे.याकरीता विद्यमान संगणकीकृत ७/१२ चा डाटा युनिकोडमध्ये